एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पूरक पोषण आहारासंदर्भात राज्यात पर्यायी व्यवस्था करणेबाबत. मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिवाणी अपिल क्र.२३३६/२०१९ (SLP (C) NO. १०१०३/२०१६ प्रकरणी दि. २६ फेब्रुवारी, २०१९ च्या आदेशांची अंमलबजावणी करणेबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- याचिका-२०१९/प्र.क्र.५/का-५
३ रा माळा, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ एप्रिल, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय क्र.एबाविं-२०१७/प्र.क्र.१०९/का-५,दि.२९.४.२०१७.
२) मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिवाणी अपिल क्र.२३३६/२०१९ (SLP (C) NO.१०१०३/२०१६ आदेश दि. २६ फेब्रुवारी, २०१९.
३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/न्या.प्र./आदेश/२०१९/१०५९, नवी मुंबई दि.०८.०३.२०१९ व पत्र क्र.एबाविसेयो/आरोग्य व पोषण/२०१९/११०९, नवी मुंबई दि.१३.३.२०१९ चे पत्र व सहपत्र.
४) शासनाच्या क्र.याचिका-२०१९/प्र.क्र.०६/का-५, दि.१८.०३.२०१९ च्या पत्रासह दि. १५.०३.२०१९ च्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१९.०४.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार संदर्भाधिन शासन निर्णय दि.२९.४.२०१७ अन्वये दिलेल्या १८ संस्थांचे काम मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. २६.२.२०१९ चे आदेशानुसार संदर्भाधिन पत्र क्र.२ अन्वये थांबविण्यात आले आहे. आता ज्या ठिकाणी १८ संस्थांचे काम रद्द करण्यात आले आहे, त्या ठिकाणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने १० दिवसांच्या आत पर्यायी व्यवस्था करावयाचे निर्देश क्र. ५२ खालीलप्रमाणे आहेत-

52. It is open to the state government to make alternative arrangements and they are restrained from continuing the existing system of supply in the interregnum period. This decision as to alternative arrangement should be taken within ten days

त्यामूळे याप्रकरणी तात्काळ कोणत्या प्रकारे पर्यायी व्यवस्था करावी असे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भाधिन दि.१३.०३.२०१९ च्या पत्रान्वये प्रस्तावित केले होते. त्यानुषंगाने प्रस्तुत बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यातील ग्रामीण /आदिवासी व नागरी भागातील लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार योजनेतंर्गत टीएचआर वितरीत करावयाच्या ई-निविदा प्रक्रियेसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६.२.२०१९ च्या आदेशान्वये ज्या ठिकाणी १८ संस्थांचे काम रद्द करण्यात आले आहे, त्या ठिकाणी १० दिवसांच्या आत पर्यायी व्यवस्था करावयाचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या देण्यात आले आहेत. सदर निर्देश खालीलप्रमाणे आहेत :-

52. It is open to the state government to make alternative arrangements and they are restrained from continuing the existing system of supply in the interregnum period. This decision as to alternative arrangement should be taken within ten days

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार याप्रकरणी पर्यायी व्यवस्था करता येण्यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता दि. १५.३.२०१९ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने राज्यातील पूरक पोषण आहारासंदर्भात खालीलप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पूरक पोषण आहार वितरीत करण्याकरीता पर्यायी व्यवस्था करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

गरम ताजा आहार (HCM) -

१. सद्य: स्थितीत नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना ज्या महिला बचत गटांमार्फत आहार पुरवठा सुरु आहे त्यांचे मार्फत नवीन निविदा मंजूर होई पर्यंत आहार पुरवठा सुरु ठेवण्यात यावा.

२. ग्रामीण भागातील ज्या ठिकाणी महिला बचत गटांमार्फत आहार पुरवठा सुरु आहे त्यांचे मार्फत नवीन निविदा मंजूर होई पर्यंत आहार पुरवठा सुरु ठेवण्यात यावा.

३. ग्रामीण भागातील ज्या ठिकाणी महिला बचत गटांनी ताजा गरम आहाराचा पुरवठा बंद केला आहे त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था अंतर्गत महिला संस्थांमार्फत कच्चा धान्य पुरवठा करण्यात येत आहे. अशा ठिकाणी नविन टेंडर मंजूर होईपर्यंत कच्चा धान्य पुरवठा सुरु ठेवण्यात यावा.

THR पुरवठयाबाबत-

ज्या ठिकाणी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या दि.०८.०३.२०१९ च्या पत्रान्वये, १८ संस्थांचे THR पुरवठा थांबविण्यात आलेला आहे, त्या ठिकाणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने १० दिवसांच्या आत पर्यायी व्यवस्था करावयाचे निर्देश असल्याने महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ, मर्या. मुंबई (महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई.) या निम शासकीय संस्थेकडून खालीलप्रमाणे कच्चे धान्य पुरवठा करण्यास मान्यता देण्यात येत आहे-

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या वयोगटानुसार शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार (६ महिने ते ३ वर्षाची बालके प्रती लाभार्थी प्रती दिन रुपये ८.००, गरोदर व स्तनदा माता व किशोरवयीन मुली यांना प्रती लाभार्थी प्रती दिन रुपये ९.५० व कुपोषित बालकांना प्रती लाभार्थी प्रती दिन रुपये १२.००) कच्चे धान्य व किराणा माल पुरवठा करण्यास महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक राज्य सहकारी महासंघ मर्या., मुंबई. या निमशासकीय संस्थेकडून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (सदर पाककृतींच्या दरांत, जीएसटी व अंगणवाडी केंद्रांपर्यंत लाभार्थीनिहाय पॅकिंग करुन वाहतूक खर्च समाविष्ट राहील. तसेच

खालील पाककृतींचे बाबनिहाय स्वतंत्र पॅकिंग करून एका मोठया पॅकिंग मधे समाविष्ट करणे आवश्यक राहिल.)

पाककृती -१ (६ महिने ते ३ वर्षाची बालके)

अ.क्र.	**धान्य प्रकार**	**प्रति लाभार्थी प्रतिदिन द्यावयाच्या धान्याचा प्रकार**	**५० दिवसांची (२ महिन्यासाठी) पॅकिंग साईज**
१	गहू	५६ ग्रॅम	२.८०० किलो ग्रॅम
२	मसूरडाळ	३० ग्रॅम	१.५००किलो ग्रॅम
३	मिरची	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
४	हळदी	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
५	मीठ	८ ग्रॅम	०.४००किलो ग्रॅम
६	सोयाबीन तेल	१० ग्रॅम	०.५००किलो ग्रॅम
७	चवळी	३० ग्रॅम	१.५००किलो ग्रॅम
	एकूण	**१४२ग्रॅम**	**७.१००किलो ग्रॅम**

वरील पाककृतींमधून ५०० किलो कॅलरीज उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथीने मिळणे आवश्यक राहील.

पाककृती -२ (६ महिने ते ३ वर्षाची बालके)

अ.क्र.	**धान्य प्रकार**	**प्रति लाभार्थी प्रतिदिन द्यावयाच्या धान्याचा प्रकार**	**५० दिवसांची (२ महिन्यासाठी) पॅकिंग साईज**
१	गहू	६२ ग्रॅम	३.१००किलो ग्रॅम
२	मूगडाळ	२६ ग्रॅम	१.३००किलो ग्रॅम
३	मिरची	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
४	हळदी	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
५	मीठ	८ ग्रॅम	०.४००किलो ग्रॅम
६	सोयाबीन तेल	१० ग्रॅम	०.५००किलो ग्रॅम
७	मटकी	२६ ग्रॅम	१.३००किलो ग्रॅम
	एकूण	**१४० ग्रॅम**	**६.९५०किलो ग्रॅम**

वरील पाककृतींमधून ५०० किलो कॅलरीज उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथीने मिळणे आवश्यक राहील.

पाककृती -१ (गरोदर स्त्रिया व स्तनदा माता आणि किशोरवयीन मुली या लाभार्थ्यांकरीता)

अ.क्र.	धान्य प्रकार	प्रति लाभार्थी प्रतिदिन द्यावयाच्या धान्याचा प्रकार	५० दिवसांची (२ महिन्यासाठी) पॅकिंग साईज
१	गहू	६६ ग्रॅम	३.३००किलो ग्रॅम
२	मसूरडाळ	३८ ग्रॅम	१.९००किलो ग्रॅम
३	मिरची	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
४	हळदी	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
५	मीठ	८ ग्रॅम	०.४००किलो ग्रॅम
६	सोयाबीन तेल	१० ग्रॅम	०.५००किलो ग्रॅम
७	चवळी	४० ग्रॅम	२.०००किलो ग्रॅम
	एकूण	**१७० ग्रॅम**	**८.५००किलो ग्रॅम**

वरील पाककृतींमधून ६०० किलो कॅलरीज उष्मांक व १५ ते २० ग्रॅम प्रथीने मिळणे आवश्यक राहील.

पाककृती -२ (गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व किशोरवयीन मुली)

अ.क्र.	धान्य प्रकार	प्रति लाभार्थी प्रतिदिन द्यावयाच्या धान्याचा प्रकार	५० दिवसांची (२ महिन्यासाठी) पॅकिंग साईज
१	गहू	८५ ग्रॅम	४.२५०किलो ग्रॅम
२	मूगडाळ	३३ ग्रॅम	१.६५०किलो ग्रॅम
३	मिरची	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
४	हळदी	४ ग्रॅम	०.२००किलो ग्रॅम
५	मीठ	८ ग्रॅम	०.४००किलो ग्रॅम
६	सोयाबील तेल	१० ग्रॅम	०.५००किलो ग्रॅम
७	मटकी	३३ ग्रॅम	१.६५०किलो ग्रॅम
	एकूण	**१७७ ग्रॅम**	**८.८५०किलो ग्रॅम**

वरील पाककृतींमधून ६०० किलो कॅलरीज उष्मांक व १५ ते २० ग्रॅम प्रथीने मिळणे आवश्यक राहील.

उपरोक्त पाककृतींमधून दर हे GST धरून अंगणवाडी पर्यंत पॅकिंग व वाहतूक खर्च धरून आहेत. तसेच वरिल पाककृतींमधील गहू हा महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या., मुंबई (महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई.) या संस्थेस केंद्र शासनाच्या WBNP योजनेंतर्गत २ रूपये प्रती

किलो दराने उपलब्ध करून देण्यात येईल. तथापि, केंद्र शासनाकडून गव्हाचे नियतन प्राप्त न झाल्यास खुल्या बाजारातून गहू खरेदी करून पाककृती द्यावी लागेल. केंद्र शासनाकडून गव्हाचे नियतन प्राप्त झाल्यास खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या गव्हाची प्रतीपूर्ती करण्यात येईल. तसेच गव्हाची उचल ही FCI गोदामातून महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या., मुंबई (महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई.) या संस्थेस स्वत:हून करावी लागेल. केंद्र शासनाच्या नियतनामधून प्राप्त झालेला गहू साफ केल्यानंतर जी तूट येईल ती तूट भरून कढण्यासाठी केंद्र शासनाच्या नियमानुसार १२.५% अतिरिक्त गव्हाचे नियतन त्यांना देय राहील.

तसेच ज्या ठिकाणी दि.२४.०५.२०१३ च्या निवेदेनुसार जिल्हा स्तरावर THR पुरवठयाच्या नेमलेल्या काही महिला बचत गटांची ३ वर्षाची मुद्दत संपलेली नाही व दि.२४.०५.२०१३ च्या टेंडर नुसार महिला बचत गटांची आदेश रद्द करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश नाहीत. त्यामूळे दि.२४.०५.२०१३ च्या निविदेनुसार निवड झालेल्या महिला बचत गटांची तीन वर्षाची मुदत संपे पर्यंत त्यांचे काम सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच भविष्यात ज्या तारखेला ज्या ठिकाणी संबंधित बचत गटांची ३ वर्षाची मुद्दत संपेल त्या तारखे पासून पुढे ६ महिने ते ३ वर्षाची बालके व गरोदर व स्तनदा माता व ६ महिने ते ६ वर्षाची कुपोषित बालके यांना THR ऐवजी ग्राहक फेडरेशन मार्फत कच्चे धान्य पुरवठा करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे पर्यायी व्यवस्था ही अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाची असून, सदर व्यवस्था या संदर्भातील नविन निविदा मंजूर होवून सदर निविदेद्वारे मंजूरीनुसार पुरवठा सुरू होईपर्यंतच लागू राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०४०४१३०९४०६१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.04.04 13:17:06 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव (महिला व बाल विकास)

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. विरोधी पक्ष नेता (विधान सभा/ विधान परिषद) , विधानभवन, मुंबई
५) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
९) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई

१०) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
११) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय , नाशिक
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१३) सर्व विभागीय आयुक्त
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या. मुंबई (महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई.)
१७) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षक) मुंबई/नागपूर.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर.
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२१) सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास,
२२) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद
२३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे मार्फत)
२४) सहाय्यक संचालक, (वित्त व लेखा), महिला व बाल विकास, पुणे.
२५) वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई-३२.
२६) सह सचिव/उप सचिव/ सर्व कार्यासने महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२७) निवड नस्ती (कार्यासन -५)